सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील मंत्रालय उपाहारगृह, विधानभवन उपाहारगृह साठी स्थायी अग्रिमाच्या रक्कमेत वाढ करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन,

**सामान्य प्रशासन विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक: अग्रिम १६२६/प्र.क्र.१९/राशि-३,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २३ फेब्रुवारी, २०२६

**वाचा :** १) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दिनांक १७/०४/२०१५

२) सामान्य प्रशासन विभाग (उपाहारगृहे), शासन ज्ञापन क्रमांक स्थायी अ-२०१५/ प्र.क्र.१२७/१५/विभउ/ मंउका, दिनांक १९ सप्टेंबर, २०१६

३) सामान्य प्रशासन विभाग (उपाहारगृहे), शासन ज्ञापन क्रमांक स्थाअ-२०१०/ प्र.क्र.५५/१०/मंउका, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१०

**शासन निर्णय :**

सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखाली मंत्रालय उपाहारगृह, विधान भवन उपाहारगृह, चौरस आहारगृह व कोकणभवन उपाहारगृह ही शासकीय उपाहारगृहे चालविली जातात. महाराष्ट्र विधानभवनातील मा. अध्यक्ष, मा उपाध्यक्ष, मा.सभापती, मा.उपसभापती, मा. विधिमंडळ सदस्य तसेच मा. मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.कॅबिनेट मंत्री, मा.राज्यमंत्री, मा. मुख्य सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभागामार्फत बैठका आयोजित करण्यात येतात. सदर बैठकांच्या वेळी खादयपदार्थ पुरवठा करण्यासाठी स्थायी अग्रिमाची रक्कम वापरली जाते.

२. विधानभवन उपाहारगृह योजनेकरीता संदर्भ क्र. २ अन्वये रूपये ३२,०००/- तसेच मंत्रालय उपाहारगृह योजनेकरिता संदर्भ क्र. ३ अन्वये रूपये ४०,०००/- इतकी स्थायी अग्रिमाची रक्कम मंजूर करण्यात आलेली आहे. तथापी वस्तूंच्या किंमतीमध्ये होत असलेली भाववाढ विचारात घेता, सध्याच्या मंजूर स्थायी अग्रीमामधून खर्च भागविणे अडचणीचे होत आहे. त्यामुळे सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षापासून ( दिनांक १ एप्रिल, २०२६ पासून ) पुढे विधानभवन उपाहारगृहास मंजूर असलेली स्थायी अग्रिमाची रक्कम रुपये ३२,०००/- वरुन रुपये ५०,०००/- इतकी तसेच मंत्रालय उपाहारगृहास मंजूर असलेली स्थायी अग्रिमाची रक्कम रुपये ४०,०००/- वरुन रुपये ७५,०००/- इतकी वाढविण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे

३. सदर खर्च मागणी क्रमांक ए-०४, लेखाशीर्ष २०७५ संकीर्ण सर्वसाधारण सेवा, १०८-उपाहारगृह भांडार विभाग, (००)(०१)मंत्रालय उपाहारगृह योजना (अनिवार्य) (२०७५०१३१), २१-पुरवठा व सामग्री तसेच २०७५ संकीर्ण सर्वसाधारण सेवा, १०८-उपाहारगृह भांडार विभाग, (००)(०४)विधानभवन उपाहारगृह योजना (अनिवार्य) (२०७५०१६९) याखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दिनांक १७/४/२०१५ सोबतच्या वित्तीय अधिकार पुस्तिका १९७८ मधील भाग-पहिला, उपविभाग-दोन, अनुक्रमांक १२ नियम क्रमांक ५६ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या शक्तीनुसार व अधिदान व लेखा कार्यालय यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक अलेका/नियंत्रण/टीएमफा-१४-X/५१९, दिनांक ३ जुलै, २०२५ अन्वये दिलेल्या अभिप्रायानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०२२३१४३८३३९३०७ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHANDRAKANT KRISHNA MORE

Digitally signed by CHANDRAKANT KRISHNA MORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTM, 2.5.4.20=11AC200219EDB36F7777EE1101657BEA42710902672281 22B638D6F2CDEDAD62, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2314CF333E070F9936792BC95890FA89B2F617A931B2B577B703FA858F3DF433, cn=CHANDRAKANT KRISHNA MORE
Date: 2026.02.23 14:39:55 +05'30'

( चं. कृ. मोरे )
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, लोक भवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री, पणन, राजशिष्टाचार यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सर्व मा. मंत्री व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सचिव तथा विशेष चौकशी अधिकारी-२ सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालय, मुंबई
१०.प्रधान महालेखापाल ( लेखापरिक्षा)-१ महाराष्ट्र, मुंबई
११.प्रधान महालेखापाल ( लेखापरिक्षा)-२ महाराष्ट्र, नागपूर
१२.महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
१३.महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१४.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, लेखा व अधिदान कार्यालय, वांद्रे, मुंबई,

१५.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१६.कक्ष अधिकारी, व्यय-४/विनियम, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१७.महाव्यवस्थापक, मंत्रालय उपाहारगृहे, मंत्रालय, मुंबई
१८. सहाय्यक लेखा अधिकारी, मंत्रालय उपाहारगृहे, मंत्रालय, मुंबई
१९.व्यवस्थापक, मंत्रालय उपाहारगृहे/विधानभवन उपाहारगृहे
२०.निवडनस्ती.